**फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार**

**न्यायालयीन भाषा मराठीत पुरावा**

**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ ची शपथेवर साक्ष**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः अंकित रविंद्र मोहिते,

वयः३० वर्षे, व्यवसायः नोकरी,

राहणारः अंधारआळी, रोहा, ता.रोहा, जि.रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत :**

०१.　मी क्लेरिअंट कंपनीमध्ये कार्यरत आहे. माझी कामाची वेळ रोटेशन पद्धतीने तीन शिफ्टमध्ये बदलत राहते. दि.२६/११/२०१९ रोजी मी व माझे मित्र मिळून गवळवाडी येथे क्रिकेट खेळण्याकरीता गेलो होतो. तेथे संध्याकाळी ०६.०० वा. चे दरम्यान काही गुरे चरताना आम्हाला दिसली. त्यानंतर आम्ही तेथून खेळून आमचे घरी परत आलो व मी रोहा मार्केटमध्ये गेलो असताना माझा मित्र रोशन चाफेकर याने मला फोन करून रोहा शहरातून गाई चोरीला जात असून त्यांनी या आगोदर पाठलाग केला परंतू त्या मिळून आल्या नाही, असे सांगितले. त्यानंतर मला पिकअप वाहनातून गाई घेवून जात असल्याबाबत कळले होते. त्यावरून मी, माझे मित्र नितेश जाधव, रोशन चाफेकर मिळून हनुमान टेकडीचे रस्त्याने सदर पिकअप वाहन नोंदणी क्र. एम एच ०६/बी जी–३८८५ चा पाठलाग केला. काही वेळानंतर आम्ही सदर पिकअप वाहन थांबविले. त्यावेळी सदर वाहनामध्ये दानेश खान व इतर दोन व्यक्ती होत्या. सदर दोन व्यक्तींची नावे आज मला आठवत नाहीत. आम्ही दानेश खान यास गाई कोठे चालल्या आहेत या अनुशंगाने विचारणा केली असता त्याला काही सांगता आले नाही. आम्हाला सदर

पिकअपमध्ये गाई मागचे बाजूला कोंबलेल्या अवस्थेत दिसल्या. त्यांचे खाण्यापिण्याची व्यवस्था करण्यात आलेली नव्हती. त्यानंतर आम्ही सदर गाडी व व्यक्तींना घेवून पोलीस स्टेशन, रोहा येथे गेलो. मी तेथे पोलीसांना घटनेच्या अनुशंगाने माहिती दिली. मी पोलीसांना काळ्या रंगाच्या गाई असून त्यांच्या आंगावर ठिपके असल्याबाबत वर्णन सांगितले होते. पोलीस स्टेशनला मी घटनेसंबंधी तक्रार दिली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१९** देण्यात येतो.

०२.	घटना सन २०१९ मध्ये घडलेली असल्यामुळे मी आरोपींना बघितल्यास ओळखू शकत नाही.

(अर्ज नि.क्र. १८ वरील आदेशाप्रमाणे आरोपी क्र.०१ ला आज न्यायालयात हजर राहण्यापासून सुट देण्यात आली.)

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. डी. एम. वर्मा यांच्यामार्फत सुरू.**

०३.	मी दिलेली फिर्याद पोलीसांनी माझे सांगण्याप्रमाणे लिहून घेतली होती. मी पोलीसांना फिर्याद देतेवेळी माझा मित्र रोशन चाफेकर याने मला फोन करून रोहा शहरातून गाई चोरीला जात आहेत, मी, माझे मित्र नितेश जाधव, रोशन चाफेकर मिळून हनुमान टेकडीचे रस्त्याने सदर पिकअप वाहन नोंदणी क्र. एम एच ०६/बी जी-३८८५ चा पाठलाग केला, काही वेळानंतर आम्ही सदर पिकअप वाहन थांबविले, आम्ही दानेश खान यास गाई कोठे चालल्या आहेत या अनुशंगाने विचारणा केली, या बाबी सांगितल्या होत्या. परंतू त्या तशाच प्रकारे माझे फिर्यादीत नमूद नसण्याचे कारण मी सांगू शकत नाही.

०४.	हे म्हणणे खरे आहे की, माझे घरापासून के.ई.एस. शाळेमध्ये खेळाचे

मैदान आहे, माझे घराजवळील बरीच मुले सदर शाळेचे मैदानामध्ये खेळायला जातात, सदर शाळेचे मैदान गवळवाडी गावचे मैदानाचे तुलनेत मला जवळ आहे, राकेश महामुनी, रोशन चाफेकर व तेजस देशमुख माझे मित्र आहेत.

०५. हे म्हणणे खरे आहे की, पिकअप वाहनाचा मागील बाजूचा हूड ऊंच असतो, गायी वेगवेगळ्या जातीच्या असतात, गायीचे जातीप्रमाणे त्यांचे आकारमान बदलते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस स्टेशनला मी व इतर २००–३०० लोक गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटना २५/११/२०१९ रोजी रात्री ०८.०० वा. घडली होती, त्या अनुशंगाने मी तक्रार रात्री ०२.०० वा.पोलीस स्टेशनला दिली, मी तक्रार दिली त्यावेळी माझे ५०–६० मित्र तेथे हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस माझी तक्रार घ्यायला तयार नव्हते, मी त्यांचेवर दबाव टाकून माझी तक्रार त्यांना घ्यायला लावली, कथीत घटनेचेपूर्वी झालेल्या गाई चोरीच्या घटनांचा माझे मनात राग होता.

०६. हे म्हणणे खरे नाही की, दि.२५.११.२०१९ रोजी माझा मित्र रोशन चाफेकर याने मला फोनवरून गाई चोरीला जात असल्याबाबत माहिती दिली नव्हती, त्यानंतर मी व माझे मित्र मिळून नमूद पिकअप वाहनाचा पाठलाग केला नव्हता, त्यामध्ये आम्हाला दानेश खान व इतर दोन व्यक्ती आढळले नव्हते, त्यामध्ये गाईंना कोंबलेल्या अवस्थेत ठेवलेले नव्हते, त्यांचे खाण्यापिण्याची व्यवस्था करण्यात आलेली नव्हती, आम्ही सदर व्यक्ती व गाडीसह पोलीस स्टेशनला गेलो नव्हतो, तेथे मी खोटी फिर्याद दिली.

| | |
|---|---|
| प्रश्न – | वाहनामध्ये गाई कोंबून उभ्या केल्यास वाहन काही अंतर गेल्या नंतर त्यांना वाहनाचा भाग घासून जखम होवू शकते? |
| उत्तर – | पिकअप वाहन केवळ एक कि.मी. अंतर गेले होते. |

०७. हे म्हणणे खरे नाही की, मी माझा मित्र रोशन चाफेकर याचे

सांगण्यावरून आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

sunil sakharam mahale
Digitally signed by sunil sakharam mahale
Date: 2023.06.14 17:49:36 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)

दि.१४.०६.२०२३. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.